MHWS08000304-2025

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | १८/०२/२०२५ |
| नोंदणी दिनांक | १८/०२/२०२५ |
| निकाल दिनांक | २२/०७/२०२६ |
| कालावधी | ०१ व. ०५ म. ०४ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२ रिसोड, जि. वाशिम यांचे न्यायालय.**

(पिठासीन अधिकारी – दिनेश मु. गायकवाड)

**फौ.कि.अर्ज क्र.२०/२०२५** **नि.क्र.२५**

पंचफुला रानोजी दुबळकर,
वय – ४४ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. कंकरवाडी, ता. रिसोड, जि. वाशिम. **...अर्जदार**

**– विरुध्द –**

रानोजी लक्ष्मण दुबळकर,
वय –४९ वर्षे, धंदा – नोकरी व शेती,
रा. कान्हा, ता. जिंतुर, जि. परभणी,
ह.मु. दुय्यम निबंधक कार्यालय परभणी, ता. जि. परभणी. **...गैरअर्जदार**

---

अर्जदारातर्फे विधीज्ञ – श्री. एस. ए. पंडीत.
गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ – श्री. व्ही. एस. मानमोठे.

---

**न्यायनिर्णय**

(पारीत दिनांक २२/०७/२०२६)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा भा.न्या.सु.सं. कलम १४६ प्रमाणे अर्जदार हिला रु.२५,०००/– दरमहा वाढीव खावटी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :**

२. अर्जदार ही गैरअर्जदाराची कायदेशीर लग्नाची पत्नी असून गैरअर्जदाराने

तिला सोडून दिलेले आहे व तिची कोणत्याही प्रकारची खाण्या–पिण्याची, कपडे–लत्त्यांची व औषध उपचाराची व्यवस्था गैरअर्जदाराने केली. त्यामुळे अर्जदाराने दि. ०७/०७/२००९ रोजी न्यायालयात एम.जे.सी.क्र.५६/२००९ कलम १२७ सी.आर.पी.सी. प्रमाणे वाढीय खावटी मिळणेकरीता अर्ज केला होता. सदर अर्ज दि. ०५/०३/२०१० रोजी निकाली लागून अर्जदाराला केवळ रु.१,८००/– महिना गैरअर्जदाराने द्यावा असा आदेश झाला होता. त्यामुळे अर्जदाराने सन २०११ मध्ये कि. फौ.अर्ज क्र.२९/२०११ नुसार खावटी वाढविण्यासाठी अर्ज केला असून सदर अर्ज दिनांक २३/०५/२०१२ रोजी मंजूर होवून अत्यंत अल्प रू.२००/– वाढीव खावटी देण्याचा आदेश झाला होता. परंतु सदर आदेशानुसार गैरअर्जदार खावटी वसुली प्रकरणात नियमीत खावटी भरत नाही. त्यामुळे ऐवढ्या अल्पशा रकमेवर अर्जदाराची उपासमार होत आहे.

**३.** अर्जदाराने पुढे कथन की, सन २०१२ रोजीच्या व आजच्या जीवनावश्यक वस्तुंच्या भावात खूप मोठी वाढ झाली आहे. सन २०१२ साली सुध्दा रू.२,०००/– प्रतीमाह या अर्जदाराला पुरेसे नव्हते आणि याउलट आजच्या बदललेल्या परिस्थितीत रू.२,०००/– महीन्यावर जगणे अर्जदाराला कठीण झाले आहे. कारण की, गहु, तांदुळ, तेल, मिठ, साखर, प्रवास भाडे, कंपडे–लत्ते व औषध उपचार या सर्वांच्या किंमतीत भरमसाठ वाढ झालेली आहे. तसेच आजरोजी अर्जदाराला वि. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे रु.२,०००/– मिळतात त्यामध्ये अर्जदाराच्या खाण्यापिण्याच्या, औषधपाण्याचा प्राथमीक गरजा सुध्दा भागत नाहीत. तसेच अर्जदार हिला राहण्याकरिता कुठल्याही प्रकारचे स्वतःचे घर नसल्यामुळे तिला भाड्याच्या खोलीमध्ये राहण्याची वेळ आली आहे. त्यामुळे अर्जदाराला जीवन जगणे करिता खावटी रक्कम वाढून मिळण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदाराला खावटी वाढून मागण्याचा

अर्ज करावा लागत आहे. तसेच अर्जदार हिचेकडे उदर निर्वाह करणेसाठी कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही.

४. अर्जदार हिचे पुढे कथन की, अर्जदार स्वतः तिचा उदर निर्वाह करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे अर्जदार हिला महीण्याकाठी उदर निर्वाह करणेसाठी व औषध उपचारासाठी कमीत कमी रु.२५,०००/– लागतात. याउलट गैरअर्जदार हा नोकरीवर असून त्यापासून त्याला दरमहा रु.७५,०००/– पगार मिळतो. तसेच, गैरअर्जदाराकडे मौजे चारठाणा व मौजे कान्हा येथे ०६ एकर ओलीताची शेत जमिन आहे. सदर शेतजमिनीमधून खर्च वजा जाता रु.१०,००,०००/– रूपये सहज उत्पन्न होते. ही सर्व परिस्थिती पाहता गैरअर्जदाराची आर्थिक स्थिती अतिशय चांगली आहे. याउलट अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे अर्जदाराने मागीतल्याप्रमाणे वाढीव खावटी म्हणून अर्जदार हिला रु.२५,०००/– गैरअर्जदार हा सहजरित्या देवू शकतो ती देण्याची कायदेशीर जबाबदारी सर्वस्वी गैरअर्जदाराची आहे. अर्जदाराचा अर्ज मंजुर न केल्यास अर्जदाराला जीवन जगने कठीण होवून जाईल. अर्जदाराला वाढीव खावटी रकमेची नितांत गरज आहे व सदर रक्कम गैरअर्जदार अर्जदारास सहज देवू शकतो. त्यामुळे अर्जदार सदरचा वाढीव खावटीचा अर्ज मंजूर होण्याबाबत विनंती करत आहे.

५. गैरअर्जदार याने प्रस्तुत प्रकरणात हजर होवून नि.क्र.८ वर म्हणणे दाखल केले. गैरअर्जदाराने अर्जदारासोबतचे नाते मान्य करुन इतर मजकूर नाकारलेला आहे. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन की, अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असून त्यांने अर्जदाराला सोडून दिले नसून अर्जदार ही स्वताःच्या स्वखुशीने व मर्जीने माहेरी राहत आहे. गैरअर्जदार आज ही अर्जदार हिला नांदवन्यास तयार आहे. गैरअर्जदार मानसिक, आर्थिक व शारीरीक त्रास व्हावा या वाईट उद्देशाने गैरअर्जदाराविरुध्द अर्जदाराने सदरचे खोटे प्रकरण दाखल केले आहे.

**६.** अर्जदार स्वतःच्या मर्जीने तिच्या माहेरी भावाकडे राहत असून तिचा वडिलोपार्जीत शेतीमध्ये वाटा आहे. कंकरवाडी येथे असलेल्या वडिलोपार्जीत शेतीमध्ये अर्जदार शेती करून वर्षाकाठी २ ते ३ लाख रुपये उत्पन्न मिळवते तसेच अर्जदार ही अपंग नसल्याने शेतीचे व इतर कामे चांगल्या पध्दतीने करु शकते व तिचा उदरनिर्वाह करू शकते. याऊलट गैरअर्जदार हे अपंग व्यक्ती असून दैनंदीन कामासाठी दुसऱ्यांवर अवलंबून आहे. तसेच गैरअर्जदार यांच्यावर इतरही जबाबदाऱ्या असल्याने त्यांना मिळणाऱ्या पगारामध्ये त्यांचा कसाबसा उदरनिर्वाह व औषधोपचार चालतो. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदारास वाढीव खावटी देण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार यांचे विरुध्द अर्जदाराने विदयमान न्यायालयात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा अंतर्गत प्रकरण क्र.३५/२०११ दाखल केले आहे. सदर प्रकरणामध्ये अर्जदारास प्रत्येक महीन्याला रु.१,५००/- (एक हजार पाचशे रुपये फक्त) वाढीव अंतरीम खावटी मंजूर करण्यात आली आहे. तसेच प्रकरण क्र.एम.जे.सी.५६/२००९ मंजूर होवून प्रतिमहीना रु.१,८००/- अर्जदारास मंजूर झाली आहे. तसेच कि.फौ.अर्ज.क्र.२९/२०११ प्रमाणे रु.२००/- वाढीव खावटी मंजूर झाली आहे. त्यामुळे प्रकरण क्र.३५/२०२१ मधील प्रतिमहिना रु.१,५००/- व खावटी प्रकरणातील प्रतिमहिना रु.२००/- अर्जदाराच्या उदरनिर्वाहासाठी, औषधोपचार व इतर गरजासाठी पुरेशी रक्कम आहे. त्यामुळे अर्जदारास वाढीव खावटी देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**७.** अर्जदाराचे विधिज्ञ श्री.एस. ए. पंडीत यांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे याचे कथनावरुन माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात व त्याचे कारणमिमांसा व निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही शाबीत करते का की, गैरअर्जदार याच्या वार्षीक उत्पन्नात वाढ झालेली असल्यामुळे अर्जदार ही मागणी प्रमाणे गैरअर्जदार यांच्याकडून वाढीव खावटी मिळण्यास पात्र आहे ? | ...अंशतः होकारार्थी |
| २. | आदेश कोणता? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

८. अर्जदार हिने निशाणी क्र.९ वर तिला स्वत:ला शपथेवर तपासले. तसेच नि.क्र.१२ व १३ वर मौजे कान्हा ता. जिंतुर जि. परभणी येथील गट क्र.१०० व मौजे चारठाणा ता. जिंतुर जि. परभणी येथील गट क्र.२४९ याचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. तसेच नि.क्र.१४ वर सह दुय्यम निबंधक वर्ग २ परभणी यांनी गैरअर्जदाराचे पगारपत्रकाबाबत माहिती अधिकारात दिलेली माहिती दाखल केली आहे. अर्जदार हिने नि.क्र.२१ वर पुरावा बंदची पुरसीस दाखल केली आहे.

९. याउलट गैरअर्जदार यांना पुरेसी संधी देवून देखील त्यांनी अर्जदार हिचा उलटतपास घेतला नाही अथवा कोणताही पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे नि.क्र.१ वर दि.०६/०५/२०२६ रोजी आदेश पारीत करुन गैरअर्जदाराचा पुरावा बंद केला.

**मुद्दा क्रमांक १ बाबत** :-

१०. अर्जदार हिच्या अर्जातील व शपथपत्रातील कथने एकसमान असल्यामुळे

त्याची पुनःरावृत्ती टाळण्याकरीता सदरची कथने पुन्हा घेतलेली नाही.

**११.** अर्जदार हिने सदरचा अर्ज खावटी रक्कम वाढवून मिळण्याकरिता केलेला आहे. अर्जदार यांना यापुर्वी फौ.कि.अर्ज क्र.५६/२००९ मध्ये प्रतिमहिना अर्जदार हिस रू.१,८००/– व फौ.कि.अर्ज.क्र.२९/२०११ मध्ये प्रतिमहिना रु.२००/– वाढीव खावटी मंजूर झालेली आहे. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदाराच्या उत्पन्नात वाढ झालेली असून गैरअर्जदार हा नोकरीवर असून त्यापासून त्याला दरमहा रु.७५,०००/– पगार मिळतो. तसेच, गैरअर्जदाराकडे मौजे चारठाणा व मौजे कान्हा येथे ०६ एकर ओलीताची शेत जमिन आहे. सदर शेतजमिनीमधून खर्च वजा जाता रु.१०,००,०००/– रूपये सहज मिळते. अशा परिस्थितीत गैरअर्जदार हा अर्जदार हिला दरमहा रू.२५,०००/– वाढीव खावटी सहज देवू शकतो. बदलत्या परिस्थितीनुसार तसेच अर्जदाराच्या वाढलेल्या खर्चानुसार अर्जदाराला खावटी वाढून मिळणे आवश्यक आहे.

**१२.** अर्जदार हिने अर्जातील कथने शपथेवर पुरावा दाखल करुन शाबीत केलेली आहेत. गैरअर्जदार याने सदर प्रकरणी अर्जदार हिचा उलटतपास घेऊन सदर शपथेवर केलेली कथने आव्हानित केलेली नाहीत. त्यामुळे अर्जदार हिच्या कथनांवर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण वाटत नाही. अर्जदार हे खावटी रक्कम मिळण्यास पात्र आहेत हे यापुर्वीच मा. न्यायालयाने स्पष्ट केले आहे. गैअर्जदार याने म्हणणे दाखल केले असले तरी म्हणण्यामधील कथने शाबीत करण्याकरिता स्वतःला न्यायालयासमोर तपासलेले नाही अथवा तोंडी व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**१३.** अर्जदार हिस एकूण प्रतिमहिना रक्कम रु.२,०००/– एवढी खावटी मिळत असल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराने प्रकरण क्र.३५/२०२१ मध्ये अर्जदारास प्रतिमहिना

रु.१५००/– अंतरीम खावटी मंजूर झाल्याचे कथन केले आहे मात्र त्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सर्वसामान्य गोष्टीचा विचार केला असता सद्यस्थितीला जीवनावश्यक वस्तुच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे तसेच महागाई देखील वाढलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या मुलभूत गरजा पुर्ण होण्याकरिता रक्कम रू.२,०००/– ही निश्चितच अपुरी रक्कम आहे. त्यामुळे अर्जदार हे वाढीव खावटी मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक–१ चे उत्तर अंशत: होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत :–**

**१४.** वरिल मुद्यांचे उत्तर होकारार्थी दिल्यानंतर वाढीव खावटीच्या रक्कमेचा प्रश्न यावेळी संभाषीत करणे योग्य होईल. अर्जदार हिने सदरचा अर्ज निर्विवादपणे शाबीत केला आहे. गैरअर्जदाराच्या पगारात वाढ होऊन त्याचा पगार रक्कम रू.७५,०००/– झालेला असल्याचे अर्जदार हिने शपथेवर कथन केलेले आहे. तसेच गैरअर्जदार याच्याकडे ०६ एकर ओलीताची शेत जमीन असल्याचे देखील कथन केलेले आहे. नि.क्र.१२ व १३ वरील गट क्र.१०० व २४९ च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन करता गैरअर्जदार यांच्या नावे २ हेक्टर ४० आर जमीन असल्याचे दिसून येते. तसेच सदर जमिनीवून गैरअर्जदार सोयाबीन, कापूस, हरभरा इत्यादी पीके घेत असल्याचे देखील दिसून येते. तसेच नि.क्र.१४ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रावरुन गैरअर्जदार हा सह जिल्हा निबंधक वर्ग–१, परभणी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असून माहे एप्रिल २०२५ चे पगारपत्रकाचे अवलोकन करता गैरअर्जदार यास कपात होवून प्रति महिना रु.४२,०००/– पगार मिळत असल्याचे दिसून येते.

**१५.** एकूणच अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यावरून गैरअर्जदार याचे उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते. अर्जदार यांच्या गरजा व जिवनावश्यक वस्तुचे वाढलेले भाव

आणि गैरअर्जदार याचे उत्पन्न या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या असता अर्जदार हिला प्रती महिना रक्कम रू.६,०००/– वाढीव खावटी मंजूर करणे योग्य होईल.

**१६.** अर्जदार भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १४६ प्रमाणे अंशतः वाढीव खावटी मिळण्यास पात्र आहे हे सिद्ध केलेले आहे. म्हणून सदर अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे:

## आदेश

**१.** सदरचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जदार हिला प्रती महिना वाढीव खावटी रु.६,०००/– (अक्षरी रक्कम रू. सहा हजार फक्त) सदरचा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासुन मंजूर करण्यात येत आहे.

**३.** सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार यांना मोफत देण्यात यावी.
(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

DINESH MUKUND GAIKWAD
Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.07.22 17:41:37 +0530

रिसोड
दि.२२/०७/२०२६

**(दिनेश मु. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Judgment/Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 22.07.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 22.07.2026 |
| **Order uploaded on** | **:** | **22.07.2026** |